शनिवार, दि. १० मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २७५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनकल्याण हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मनपा प्रशासनाचा भोंगळ कारभार!

## नगर परिषदेच्या पावती पुस्तकावर अद्यापही वसुली; आर्थिक घोटाळ्याची शक्यता

**जालना । प्रतिनिधी -** येथील नगर परिषदेचे रुपांतर जालना शहर महानगर पालिकेत होऊन दोन वर्षे उलटली आहेत. असे असले तरी अद्यापही जुन्याच म्हणजे नगर परिषदेच्या पावती पुस्तकांवरून फळ-भाजी विक्रेत्यांकडून पैसे वसुली होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे मनपात मोठा आर्थिक गैरव्यवहार होत असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून या संदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन चौकशीची मागणी केली आहे. मनपाच्याच कर्मचाऱ्यांकडून हा प्रकार होत असल्याने मनपाच्या भोंगळ कारभाराची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महानगर पालिका कार्यालयाचा कर्मचारी गजानन सोनवणे हा नुतन वसाहत भागातील भाजी विक्रेत्यांना नगर परिषद जालना यांच्या नावाने पावत्या देवून पैसे वसुल करत असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी तेथे जावून साद



बिन मुबारक यांनी विचारणा केली असता त्यांच्याकडे पुस्तक क्र. १३३, १३४, २३५ अशी तीन पुस्तके असल्याचे आढळून आले. काही लोकांकडून त्याने पावती देवून पैसे वसूल केले तर काही लोकांकडून पैसे वसूल केले जात होते. काहीं व्यावसायिकांना पावत्या दिल्या जात नाहीत. हे पैसे वसुलीचे प्रकार गेल्या तीन चार दिवसांपासून सुरू असल्याचे तेथील विक्रेते सांगत आहेत. याबाबत गजानन सोनवणे यांना विचारले असता त्यांनी मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी या पावती पुस्तकावर वसुली करण्यास सांगितले व महानगर पालिकेचे पावती पुस्तक छापलेले नसल्यामुळे सध्या नगर परिषद जालनाच्या पुस्तकावर वसुली सुरू असल्याचे सांगितले. याबाबत साद बिन मुबारक यांनी आयुक्त श्री खांडेकर यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क केला व त्या कॉलवर गजानन सोनवणे यास कनेक्ट केले असता श्री सोनवणे यांनी संतोष खांडेकर यांना सांगितले की, त्यास राजपुत मॅडम यांनी ऑर्डर दिलेली आहे व चुकीने आपले नाव सांगितले. त्यावर मनपा आयुक्त श्री खांडेकर यांनी श्री सोनवणे यांना नोटीस काढण्यात येणार असल्याचे सांगितले. या सर्व प्रकारामुळे गजानन सोनवणेचा हा काय सावळा गोंधळ सुरु आहे ते कळत नाही

हा अत्यंत मोठा भ्रष्टाचार असून यामध्ये आणखी काही मनपाचे अधिकारी-कर्मचारी सहभागी असण्याची शक्यता आहे. तसेच अशा ऑर्डर देणाऱ्या अतिरिक्त आयुक्त यांची देखील चौकशी होणे आवश्यक आहे. महानगर पालिका येथे यापुर्वी देखील पावत्याचे घोळ झालेले आहेत. कोरोना काळातील पावती व वसुलीचे प्रकरण मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद सुरू असतांना आता हे नविन प्रकरण पुढे आले आहे. महानगर पालिका ही पावत्यांच्याबाबत नेहमीच असे प्रकार करीत असल्याचे लक्षात येत आहे. वरिल लोक भाजीपाला विक्री करणाऱ्या गोरगरीबांना लुटत आहे. यांनी गेल्या काही दिवसापासून ही वसुली सुरू केली असून यामध्ये आतापर्यंत लाखो रूपये वसुल करण्यात आलेले आहे. गजानन सोनवणे यांच्याकडील ६० पेक्षा अधिक पावत्या पुराव्या दाखल उपलब्ध असल्याचेही निवदेनात नमूद आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून गजानन सोनवणे व अतिरिक्त आयुक्त यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना बडतर्फ करण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

### विविध बाजार ठेक्यांमध्येही धांदली?

महानगर पालिकेच्यावतीने शहरात विविध ठिकाणी सोमवार, बुधवार, रविवार, शुक्रवार आदी दिवशी बाजार भरविल्या जातात या बाजाराचा ठेका दरवर्षी मनपा प्रशासनाकडून दिल्या जातो. या आर्थिक वर्षात मात्र, मनपा प्रशासनाने कुणाला कोणते ठेके दिले हे अद्यापपर्यंत स्पष्ट नाही. याबाबत विचारणा केली असता मनपा प्रशासनाकडून अद्याप ठेका दिला नसल्याचे तोंडी सांगण्यात येते. असे असले तरी विविध बाजारात मोठ्या प्रमाणात वसुली सुरु आहे. शुक्रवार (दि.९) रोजी रामनगर आझाद मैदान परिसरात भरत असलेल्या बाजारात तर वसुली वाल्यांकडून दमदाटी आणि धमकी बाजारातील शेतकरी - व्यवसायिकांना दिल्याची घटना घडली आहे. आता या बाजाराचा नेमका ठेका कुणाला दिला? आणि दिला असेल असेल तर त्या नियमात धमकावून वसुली करण्याचे निर्देश आहेत का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. मुळात बाजार ठेक्यांऐवजी मनपा प्रशासनाने स्वतः वसुली केल्यास त्यांच्या उत्पन्नात भर पडण्याची खात्री आहे. असे असले तरी बाजार ठेके देऊन मस्सल पॉवर वापरून वसुली करण्याचे परवाने मनपा प्रशासन का देत आहे?

युवा आदर्श

### आत्मा ...

लक्ष ठेवतात जीवीत
कुठे भटकतो आत्मा
बाकी शोधतात संधी
कसा करावा खात्मा
जन कल्याण हे ध्येय
एखादा होई महात्मा
ओवाळे आपलाजीव
होई वंदनीय हुतात्मा
परोपकारी सेवे साठी
शतधन्य बने कृतात्मा
पुण्य संचय अतिप्रिय
ईश्वरांश तो अध्यात्मा
जाणतो प्रत्येकप्राण्यां
सर्वव्यापी रे परमात्मा
हृदय मंदिरा प्रतिष्ठीत
दिला सर्वां अंतरात्मा
वाचेच्या पलीकडे राहे
अत्यंत पवित्र शिवात्मा
चित्त मनाचे करे दमन
नियतमानस नियतात्मा
सत्पात्री सदैवदानशूर
सार्थक सिध्द धर्मात्मा
अंत:सुख न् ब्रह्मानंद
ब्रह्म अनुभव स्वात्मा
दुजाआत्म्या सुखदेई
तो खरोखर सुखात्मा
आत्म्या मिळो संतोष
असा जपा अंतरात्मा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# प्रचाररथांच्या माध्यमातून ‘तलावांचे पुनरुज्ञीवन’ कामांना वेग

## शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व गावांनी पुढे यावे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ तसेच ‘नालाखोलीकरण व रुंदीकरण’ या महत्वाकांक्षी योजनेचे राज्यात युद्धपातळीवर काम सुरू झाले आहे. प्रत्येक गावागावात जाऊन या योजनेचा प्रचाररथाद्वारे प्रचार-प्रसार तथा जनजागृती केली जात आहे. या प्रचाररथांना राज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हा, तालुका पातळीवर मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, झेडपी सीईओ जगदिश मनियार,जलसंधारण अधिकारी सुंदर वाघमारे,सर्व गट विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली सरपंच, ग्रामसेवक, शेतकरी यांना ऑडिओ, व्हिडिओ, पीपीटी सादरीकरण या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जात आहे. जिल्हाधिकारी सरांच्या शुभहस्ते प्रचाररथाचे उद्घाटन करुन जलरथाद्वारे यायोजनेची माहिती जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील गावांमध्ये देण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी उपरोक्त योजनांसाठी शासनाने आर्थिक नियोजन केले असून आपल्या परिसरातील सर्व जलसाठ्यातीलगाळकाढण्यासाठी ग्राम पंचायत किंवा सेवाभावी संस्था पात्र आहेत. आपलेगाव जलआत्मनिर्भर करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत अर्ज मागविण्यात येत असुन आपलेगाव पाणीदार करण्यासाठी शासनाच्या वरील योजनेचा लाभ घेऊन गावाच्या तलावातील, नालाखोलीकरण करुन गाळ काढुया आणि आपलेगाव जल आत्मनिर्भर बनवूया, अशीसादत्यांनी गावकऱ्यांना घातली.यायोजनेची माहिती गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार यापोर्टलवर उपलब्ध असुन, मागणी अर्ज डाउनलोड करुन अर्जात संपूर्ण माहिती नमुद करुन ते अर्ज संबंधित अधिकारी, सरपंच व ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीसह फोटो कॉपी संबंधित लिंकवर अपलोड करावी असे ते म्हणाले

आतापर्यंत या योजनेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या प्रचार रथाचे उद्घाटन राज्यातील २६ जिल्ह्यात संपन्न झाले. यात अहिल्यानगर, अकोला, भंडारा, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जळगाव, जालना, नंदुरबार, सांगली, सातारा, सोलापूर, वाशिम, यवतमाळ, धुळे, वर्धा,अमरावती, धाराशीव, गडचिरोली, लातूर, गोंदिया, कोल्हापूर, नागपूर, परभणी, चंद्रपुर आदी जिल्ह्यांचा समावेश आहे.

‘योजनेची सर्व माहिती तसेच अर्ज करण्यासाठी ‘गाळमुक्त धरण’ म्हणजेच ु.ेहिळुररी.ले’ या शासनाच्या पोर्टलला भेट द्यावी.डिमांड जनरेशन या टॅबवरुन मागणी अर्ज डाउनलोड करून भरलेला अर्ज ‘बीजेएस ॲप’वर अपलोड करावा. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा,’असे आवाहनमृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच सचिव गणेश पाटील यांनी केले आहे.

सदरील योजनेद्वारे शासन गावागावांतील तलावांमधील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणार आहे. गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे.

शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकरी यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच ‘गाळमुक्त धरण’ पोर्टलची निर्मिती करण्यासाठी भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.

बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकर्यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करीत आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी ‘सुहाना स्पाइसेस’ यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे.जालना जिल्ह्यातील भारतीय जैन संघटना जिल्हाध्यक्ष श्री. विजयकुमार जैन, दिपक मोदी, विनयकोठारी, विजयराज सुराणा, रोशनरुणवाल, नेमीचंद रुणवाल, अनिल संचेती, श्रीपाल मरलेचा, नरेंद्र जोगड, राजेश लुनिया,स्वप्निल लव्हाडे, चैतन्य वायकोस, पंडित खुले,पवन सुराणाआदिकार्यकर्ते याकामासाठी वेळ देतआहे. जिल्हा समन्वयक संदिप गवळी यांना गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार व नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेचामागणी अर्ज कशाप्रकारे भरावा याची माहिती देण्यासाठी या ७७९८९३७०८९ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराणा प्रतापसिंह जन्मोत्सवानिमित्त मिराबाई सुर्यवंशी यांचा देहदान संकल्प

**जालना । प्रतिनिधी -** हिंदवी स्वराज्याचे प्रथम उद्घोषक हिन्दूसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधत एक प्रेरणादायी आणि धाडसी निर्णय घेण्यात आला आहे. हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्या मिराबाई प्रतापसिंह सुर्यवंशी यांनी देहदान करण्याचा संकल्प करत समाजापुढे नवा आदर्श ठेवला आहे.

शुक्रवार दि. ९ मे रोजी इंदेवाडी (ता. जालना) येथील शिवराणा भवनात सुर्यवंशी कुलगौरव हिन्दूसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या अर्धपुतळ्याला वैदिक मंत्रोच्चारात दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर



सामाजिक भावना आणि राष्ट्रसेवेच्या प्रेरणेतून मिराबाई सुर्यवंशी यांनी मरणोत्तर देहदान संकल्प जाहीर केला. याप्रसंगी योगेश्वर श्रीकृष्ण महानुभाव आश्रमचे महंत सुदामराज शास्त्री यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

चार धाम यात्रा पूर्ण केलेल्या व धर्मशास्त्रानुसार पिंडदान केलेल्या मिराबाई सुर्यवंशी या हिंदू महासभेचे प्रदेश संघटन मंत्री धनसिंह सुर्यवंशी यांच्या मातोश्री आहेत. त्या अनेक वर्षांपासून राष्ट्र, धर्म आणि संस्कृतीच्या जपणुकीसाठी कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणे, त्यांना पाठबळ देणे हे त्यांचे वैशिष्ट्य राहिले आहे. महापुरुषांची जयंती ही केवळ औपचारिकतेपुरती न राहता ती राष्ट्रहितासाठी आणि सामाजिक जाणीवेच्या दृष्टीने साजरी व्हावी, असा ठाम संदेश त्यांनी या निमित्ताने दिला आहे. या संकल्पाबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, वैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मानवी शरीरावर अध्ययन करण्यासाठी देहदान आवश्यक असते. त्यामुळे ते अधिक कुशल डॉक्टर बनतात. विविध आजारांवरील संशोधनासाठी देहाचा उपयोग केला जातो. यामुळे नव्या उपचारपद्धती विकसित होतात. मृत्यूनंतरही समाजाच्या उपयोगी पडण्याचा हा सर्वोच्च मार्ग आहे. ही एक प्रकारची सेवा आणि सामाजिक योगदान आहे. देहदान हे मानवतेच्या दृष्टिकोनातून केले जाते. त्यामुळे अंधश्रद्धा, **पान ३ वर**

# बुद्ध जयंती निमित्त सोमवारी महाबुद्ध वंदनेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जगाला विज्ञानवादी धम्म सांगणारे विश्ववंदनीय तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ वी जयंती निमित्त सोमवार दिनांक १२ मे रोजी महा बुद्धवंदनेचे आयोजन करण्यात आले आहे. जालना शहरातील मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या विकाणी सकाळी ९ वाजता महा बुद्धवंदना व धम्मदेसना होणार आहे. कार्यक्रमास पूज्य भन्ते धम्मधर शाक्यपुत्र थेरो, पूज्य भन्ते शिवली शाक्यपुत्र, पूज्य भन्ते रेवत यांची उपस्थिती रहाणार असून सर्व समाज बांधवांनी यावेळी उपस्थित रहावे असे आवाहन ॲड बी.एम. साळवे, ॲड ब्रम्हानंद चहाण, सुधाकर रत्नपारखे, ॲड शिवाजी आदमाने,प्रमोदकुमार रत्नपारखे, सुधाकर निकाळजे, महेंद्र रत्नपारखे ,दिनकर घेवंदे, प्रेमानंद मगरे, सुनिल साळवे, सुधाकर रतनराव रत्नपारखे, छाया हिवाळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष संजय हेरकर, महासचिव राजकुमार दांडगे, भास्कर घेवंदे, माधुरी मोरे, सुलेखा मनवर, किरण सोनवणे, सुनिल जाधव, कांताबाई रत्नपारखे, गणपत भद्रे, नितिन निसर्गन, चंद्रकांत दाभाडे, राजेंद्र पवार, ज्ञानेश्वर डांगे, राजेंद्र अंभोरे, अच्युत मोरे,राहुल भदर्गे, सतिश वाहुळे आदींनी केले आहे. तसेच या दिवशी सर्व बौध्द समाजांनी आपल्या घरावर धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करावे आणि महा बुद्ध वंदनेस उपस्थित रहावे,असे आवाहनही करण्यात आले आहे.

# संपादकीय

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निमर्ाण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांची निवड

**पुणे -** जोगेश्वरी पूर्व येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांची कार्यकारिणी सभासद म्हणून श्री समर्थ विद्यालय जोगेश्वरी पूर्व या शाळेत २०२५ ते २०२८ करीता अध्यक्ष डॉ एम डी वळंजू यांनी निवड केली आहे.हिरवे यांचे समाजासाठी खूप छान योगदान असून वर्षातून बऱ्याच वेळा ते समाजकार्यात स्वतःला झोकून देऊन काम करीत असतात. एक हरहुन्नारी, विनोदी आणि समाजातील तळागाळातील लोकांसाठी काय चांगले करता येईल यासाठी नेहमीच ते धडपडत असतात असे डॉ वळंजू सांगतात.तर हिरवे यांची मूर्ती लहान पण किर्ती महान असून त्यांचे कार्य नेहमीच इतरांना प्रेरणा देत असल्याचे अनेक मान्यवरांनी वेळोवेळी आपल्या भाषणातून अधोरेखित केलं आहे.त्यांच्या संपर्कात आल्याने अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळतात, ते कायमच दीपगृहाचे काम करीत असतात.पत्रकारिता, शिक्षण आणि समाजसेवा या तीन घटकांवर काम करण्यासाठी त्यांचा पुढाकार असतो.हिरवे यांची निवड झाल्याने अनेकांनी त्यांचे अभिनंदन केलं असून त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




## जिल्हा संसाधन व्यक्ती कामांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्य नोडल एजन्सीच्यावतीने जिल्हास्तरावर लाभार्थ्यांना पाठपुरावा, हाताळणी सहाय्य देण्यासाठी संसाधन व्यक्तींची नामिकासूची तयार करावयाची आहे. त्यासाठी कृषि विभागामार्फत या योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्तीनुसार बंद लिफाफ्यातून अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदाकरीता शिक्षण-पदवीधर (कोणत्याही शाखेचा ) वयाची अट नाही, सविस्तर प्रकल्प अहवाल (ऊझ) बनविण्याचा अनुभव, अर्ज सादरीकरण, बँक मंजूर पद्धती, प्रक्रिया व अन्नप्रक्रियेतील अत्याधुनिक तंत्रज्ञान इत्यादींची माहिती असणाऱ्यांना व स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या पदाकरिता दि.१५ मे पर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत. योजनेच्या मार्गदर्शक सूचना, अर्जाचा नमुना, सविस्तर पात्रता परिश्रमिक (मानधन) व इतर अटी शर्ती या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय जालना येथे तसेच कृषी विभागाच्या ु.ज्ञीळीहळ.ारहरीरिहींर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या पदासाठी संस्था पात्र असणार नाहीत, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालना यांनी कळविले आहे.

# शाळा घडविते जीवन

शाळा घडविते जीवन हे विजयालक्ष्मी मणेरीकर यांचे महत्त्वपूर्ण असे पुस्तक आहे. थोडक्यात सांगायचे तर हे पुस्तक शिक्षण क्षेत्रात मार्गदर्शक ठरणारे आहे. यामध्ये त्यांनी आपल्या स्वतःच्या शाळेविषयी त्यात चालणारे उपक्रमाविषयी, शैक्षणिक उपक्रम आणि त्याला जोडून इतर उपक्रम कसे कसे राबवले जातात आणि त्यातून विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर संस्काराची शिकवण कशी दिली जाते हे आपणास बघायला मिळेल. वाचायला मिळेल.

विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी स्वतः दहा ते बारा वर्ष शाळा कॉलेजमधून शिकवायचा अनुभव आहे. अध्यापनासाठी घालवले आहेत. त्यानंतर त्यांनी आपले पती शशांक मणेरीकर यांच्या सहकार्याने २०११ मध्ये स्वतःची शाळा ग्लोबल व्हिजन स्कूलची स्थापन केली. आज ही शाळा चांगली नावारूपाला आलेली आहे.

दहावीपर्यंत वर्गासह या ठिकाणी विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आणि संस्कारकरण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते त्या करतात.

पुस्तकात एकूण ११ विभागात त्यांनी सविस्तर विवेचन केलेले आहे. शालेय प्रार्थना, शालेय प्रतिज्ञा, भारतीय शिक्षण तज्ञ त्यांचा परिचय, शालेय अभ्यासक्रम, परिपूर्ण शिक्षणाची संकल्पना, शालेय विशेष उपक्रम, जीवनमूल्याधारीत शिक्षण, पालक प्रशिक्षण त्यात सृजनशील पालकत्व या संदर्भात विवेचन, शाळेचा ग्रंथालय विभाग, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम आणि इतर शालेय उपक्रम, अशी विभागणी केलेले आहे.




सुरुवातीलाच मुलांना परिचय व्हावा म्हणून राष्ट्रगीत, वंदे मातरम, महाराष्ट्र गीत, ध्वजगीत, एनसीसी प्रार्थना, स्काऊट व गाईडची प्रार्थना, माझी शाळा ही कविता, खरा तो एकची धर्म, सरस्वती स्तवन, गायत्री मंत्र, शुभम करोति, पसायदान हे सर्व आहे.

मुख्याध्यापक प्रतिज्ञा, शिक्षक प्रतिज्ञा ,पालक प्रतिज्ञा, विद्यार्थी प्रतिज्ञा हे सर्व दिलेले आहे. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, जे .कृष्णमूर्ती , स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, बाबासाहेब आंबेडकर, अब्दुल कलाम त्याच्या शिक्षण विषयक संकल्पना दिलेल्या आहेत.

परिपूर्ण शिक्षण, विशेष उपक्रम, आणि जीवनमूल्य शिक्षण याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याचाही विचार केलेला आहे

विजयालक्ष्मी मनोगतात म्हणतात- शिक्षक ही केवळ पदवी नसून नकळतपणे स्वीकारलेली एक प्रकारे समाज घडवण्याची नैतिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी स्वीकारणाऱ्या व्यक्ती मध्ये तेवढी क्षमता असावी लागते. त्यामुळे शिक्षकी पेशा स्वीकारताना या गोष्टीची जाणीव होणे खूप गरजेचे आहे. उत्तम शिक्षक हेच उत्तम विद्यार्थी घडवतात.पुढे त्या म्हणतात-

शालेय शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरते मर्यादित नसून ते जीवनाच्या विविध पैलूंचे सकल आकलन देणारे असते. अखंड ज्ञान प्राप्त करण्याची भूक निर्माण करणे. मूलभूत जीवनावश्यक विषय शिक्षणासोबत सौंदर शास्त्र कला तांत्रिक आणि व्यवसाय शिक्षण नैतिक मूल्य शिक्षण सांस्कृतिक आणि सामाजिक विषयाची ओळख शालेय क्षेत्रात दिला जाते. ज्ञान म्हणजे माहिती तत्वज्ञान अनुभव आणि आकलन यांचा समुच्चय. पुस्तकात शाळेच्या विविध विषयावर आणि शैक्षणिक उपक्रमावर प्रसंगी लिहिलेल्या लेखाचे संकलन आहे. शाळेत कशाप्रकारे अभिनव उपक्रमांची सांगड घालून शिक्षण दिले जाते हे नमूद केले आहे.

माझी शाळा.. माझी शाळा..
सुंदर माझी शाळा..
पुस्तक पाटी.. खडू फळा.. आणि जिव्हाळा.
शाळा घडविते जीवन
ज्ञानासोबत देते संस्काराची शिकवण.

विद्यार्थ्यांना शाळेविषयी ओढ. प्रेम. शिक्षकांना विद्यार्थां विषयी जिव्हाळा, शाळेत शिक्षणाबरोबरच संस्कार, ह्या गोष्टींना शाळेत विशेष महत्व दिले जाते.ज्याची आज आवश्यकता आहे. शाळांमध्ये मार्गदर्शक ठरावे असे पुस्तक शालेय शिक्षणात क्षेत्रात काम करणाऱ्या आणि आवड असणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक, लहान मुलांचे पालक, समाजसेवक, शिक्षण अभ्यासक, यांच्यापर्यंत हे पुस्तक पोहोचावे अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. प्रत्येक शाळेच्या ग्रंथालयात हे पुस्तक असायला हवे.

शाळा घडविते जीवन
लेखिका. प्रकाशक.-
विजयालक्ष्मी मणेरीकर. नाशिक.
देगगी मुल्य. ३००
संपर्क..९८२२६८३७९९.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव**
**मोबाईल नंबर ८९९९५६६९१७**



dilipdeshpande24gmail.com

# 'गझवा-ए-हिंद'चे षडयंत्र उध्वस्त करणारे सनातन राष्ट्र !

भारत आज विकासाच्या, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आणि जागतिक सहकार्याच्या दिशेने वाटचाल करत असतानाच, त्याच वेळी एक अंतर्गत धोका दिवसेंदिवस गडद होत आहे, तो म्हणजे 'गझवा-ए-हिंद'चा धोका ! 'गझवा-ए-हिंद' म्हणजे भारतात जिहादी राष्ट्र स्थापनेच्या दिशेने उचललेली कट्टरपंथीय पावले ! ही फक्त कल्पना नाही, तर प्रत्यक्षात अमलात आणण्याचे कट रचले जात आहेत. सध्या मोठ्या प्रमाणात चालू असलेला लव्ह जिहाद, भूमी जिहाद, हलाल जिहाद हे याच 'गझवा-ए-हिंद'चे छोटे स्वरूप आहे. आयसिस (खडखड), अल कायदा, अन्सार-उल-इस्लाम, पीएफआय यांसारख्या संघटना सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांमध्ये विष पेरत आहेत. त्यांचे स्थानिक समर्थन करणारे 'स्लीपर सेल्स' भारतात हळूहळू पाळेमुळे रोवू पाहत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, भारतातील अनेक ठिकाणी, विशेषतः केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये इसिसशी संबंधित आतंकवादी कारवाया उघडकीस आल्या आहेत. शिक्षित तरुणांना लक्ष्य करून त्यांच्या विचारसरणीचा वापर करून त्यांना जिहादच्या मार्गावर नेले जात आहे. यामागे केवळ हिंसाचार नाही, तर भारतात 'खिलाफत' प्रस्थापित करण्याचा दुष्ट हेतू आहे. या पार्श्वभूमीवर हिंदूंनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे - आपण निधर्मी राष्ट्रात सुरक्षित आहोत का? त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने उभ्या राहिलेल्या हिंदवी स्वराज्याच्या पावलांवर पाऊल ठेवून, आता भारताला पुन्हा एकदा सनातन राष्ट्र, हिंदू राष्ट्र, रामराज्य बनवण्यासाठी सज्ज व्हावे लागेल. कारण ही हिंदूंच्या अस्तित्वाची, सनातन संस्कृतीच्या पुनरुत्थानाची लढाई आहे. 'गझवा-ए-हिंद'ला 'सनातन राष्ट्र' हेच एकमेव उत्तर आहे', हे हिंदूंच्या मनावर अंकित करावे लागेल.

**आतंकवादाला धर्म असतो याची प्रचिती !**

नुकताच पहलगाममध्ये पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. कलम ३७० हटवल्यानंतरही दहशतवादी हल्ले चालूच आहेत. आज पुन्हा काश्मीरमध्ये हिंदू मारले गेले, जात विचारली नाही फक्त हिंदू आहेत का? एवढेच विचारले ! २६ हिंदूंनी आपल्या प्राणांचे मोल देऊन आतंकवादाला धर्म असतो, हे सिद्ध केले आहे. मुंबईमध्ये १९९२-९३ च्या दंगलीदरम्यान 'राधाबाई चाळ' या घटनेने शहराला हादरवून टाकले होते. ही चाळ मुंबईतील जोगेश्वरी भागात आहे. १९९३ च्या जानेवारी महिन्यात, या चाळीत ६ हिंदू नागरिकांना जिवंत जाळण्यात आले होते. या घटनेमध्ये हल्लेखोरांनी धर्म ओळखूनच हिंदूंना लक्ष्य केले होते. अशा अनेक घटना हिंदूंवर विशिष्ट धर्माने केलेल्या अत्याचाराच्या साक्षी आहेत. आज पहलगाम मध्ये जे घडलं, तेच मुर्शिदाबाद मध्ये घडत आहे; सनातनी क्षेत्रांवर, सण-उत्सवांवर, मंदिरांवर, महिलांवर आणि संपूर्ण हिंदू समाजावर तसेच जगभरात अशाच प्रकारे हिंसा आणि नरसंहार चालू आहेत. पहलगाम मधील आतंकवादी आक्रमणाचे दायित्व 'द रेझिस्टन्स फोर्स' (टीआरएफ) या आतंकवादी संघटनेने स्वीकारले आहे. वर्ष २०४७ पर्यंत भारताला गझवा-ए-हिंद बनवण्याचे मोठे षड्यंत्र 'आय.एस.आय.' आणि 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' यांनी रचल्याचे राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेने उघड केले आहे.

आतंकवाद्यांना भारतात 'गझवा-ए-हिंद' आणायचे आहे
इसिस, पीएफआय आणि अफगाणिस्तानमधील खडखड-घ यांनी भारताला गझवा-ए-हिंद बनवण्याचे षड्यंत्र रचले आहे. खडखड-घ काश्मीरमध्ये 'स्लीपर सेल्स' म्हणून सक्रिय आहे, तसेच सोशल मीडिया प्रपोगंडाद्वारे भारतातील तरुणांना या संघटनांमध्ये भरती करत आहे. केरळ, पश्चिम बंगाल, कर्नाटक, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि जम्मू-काश्मीरमध्ये स्थानिक कट्टरवादी गटांशी संबंधित असलेल्या 'स्लीपर सेल्स'चा धोका आहे. यामुळे भारताला या धार्मिक कट्टरते पासून मुक्त करण्यासाठी सनातन राष्ट्राची स्थापना करणे अनिवार्य आहे.

**इस्लामिक स्टेटची छुपी रणनीती !**


इस्लामिक स्टेट (खडखड) ही आतंकवादी संघटना इराक-सिरियात अत्यंत क्रूर कृत्यांसाठी कुप्रसिद्ध आहे. १९९० मध्येच काश्मीरमध्ये निझाम-ए-मुस्तफा म्हणजेच इस्लामिक स्टेटची सुरुवात झाली होती. आजही खडखड चा धोका कायम आहे - २०२४ मध्ये मॉस्कोमध्ये आणि २०२५ मध्ये न्यू ऑर्लिन्समध्ये प्रेरित हल्ले झाले. जरी त्यांचे भौगोलिक नियंत्रण संपले असले तरी, त्यांच्या गुप्त सेल्स, विचारधारा आणि प्रेरणेतून होणारे हल्ले हे जागतिक सुरक्षेसाठी आणि भारतातील सामाजिक शांततेसाठी गंभीर धोका निर्माण करत आहेत. त्यांनी आपली रणनीती बदलली आहे - थेट युद्धाऐवजी छुपा घात, विचारधारात्मक प्रचार आणि स्थानिक गटांना प्रेरणा देणे हे आता त्यांच्या कारवायांचे केंद्रबिंदू आहे.

**हिंदू सुरक्षित आहेत का ?**

इसिस व्यतिरिक्त भारतासाठी धोका ठरू शकणाऱ्या लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, हिज्बुल मुजाहिदीन, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, इंडियन मुजाहिदीन, अल-कायदा इन इंडियन सबकॉँटिनेंट, स्थानिक इस्लामी कट्टर गट (केरळ, बंगाल, तामिळनाडूतील), स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया या ८ प्रमुख दहशतवादी संघटना तसेच रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरी भारताच्या सुरक्षा आणि कायदा-व्यवस्थेला धोका आहेत. अहिंदूंची वाढती लोकसंख्या ही देश आणि हिंदू धर्म यांसाठी धोक्याची घंटा आहे. याशिवाय, गेल्या वर्षभरात हिंदूंना आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या अनेक घटना घडल्या. मुसलमानबहुल मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात धर्मांधांकडून करण्यात आलेल्या आंदोलनाच्या वेळी मोठ्या प्रमाणात हिंसाचार करण्यात आला. अनेक हिंदूंची घरे, दुकाने लुटण्यात आली आणि जाळपोळ करण्यात आली. त्यामुळे घाबरलेल्या ४०० हून अधिक हिंदूंनी तेथून पलायन केले आहे. बंगालमध्ये झालेल्या हिंसाचारात मुर्शिदाबाद, मालदा, नाडिया, दक्षिण २४ परगणा हे ४ जिल्हे अशांत झालेले आहेत. बंगाल, बिहार तसेच महाराष्ट्र राज्यांत धर्मांधांनी घडवून आणलेला हिंसाचार आता भारतातील इतर राज्यांमध्येही पसरत आहे. देशातील जिहादी गट, स्लीपर सेल्स आणि त्यांना समर्थन देणारे धर्मांध भारतासाठी मोठे आव्हान आहेत.

**सनातन राष्ट्रच सर्वांचे रक्षण करू शकते !**

हजारो वर्षांपासून कट्टरपंथीय भगव्या भारताला हिरवे बनण्याची वाटच पाहत आहेत. पूर्वीच्या काळातील जिहादी आक्रमकांनी केवळ भारतातील संपत्ती लुटली नाही, तर या भूमीतून हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि हिंदूंना नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्या काळी हिंदूंनी गाजवलेल्या पराक्रमामुळे त्यांचे हे स्वप्न कधीच पूर्ण होऊ शकले नाही. आता हेच स्वप्न बाळगून जगभरातील जिहादी, आतंकवादी आणि धर्मांध भारताला व हिंदूंना लक्ष्य करत आहेत. 'गझवा-ए-हिंद' हे ध्येय धर्मांधांना पहिल्यापासून दिलेले आहे, त्यामुळे ते त्यांच्या मार्गावर चालले आहेत. पण आतापर्यंत हिंदू त्यांना कोणतेही उत्तर देऊ शकले नाहीत, कारण त्यांच्या समोर कोणतीही दिशा नव्हती, ध्येय नव्हते. यासाठी पोटा, टाडा सारखे मोठे कायदे करूनही याला आळा घालता आला नाही. हिंदूंना नेहमी मार खावा लागला. यावर एकच उपाय आहे - प्रतिउत्तर देण्याचा किंवा स्वसंरक्षण करण्याचा. आणि हा उपाय 'सनातन राष्ट्राच्या स्थापनेतूनच' मिळू शकतो. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांनी सनातन संस्थेच्या स्थापनेपासून हिंदूंना हिंदू राष्ट्र, सनातन राष्ट्र हे ध्येय दिले. त्यामुळे सगळ्या हिंदूंना एक दिशा मिळाली. त्यामुळे जिहादी जे जे षड्यंत्र करत होते, त्यात लव्ह जिहाद, लँड जिहाद असेल, ती हळूहळू विफल होत आहेत. त्यामुळे 'गझवा-ए-हिंद'ची रणनीती सनातन राष्ट्रामुळे उध्वस्त होऊ लागली आहे.




**हिंदूंना ध्येय मिळाल्यामुळे सनातन राष्ट्राच्या दिशेने वाटचाल !**

हिंदूंना ध्येय मिळाल्यामुळे त्या दिशेने हिंदूंची वाटचाल चालू आहे. पूर्वी सर्व हिंदू संघटना वेगवेगळ्या लढत होत्या, पण सनातन राष्ट्र हे ध्येय दिल्यामुळे या सर्व संघटना एकत्र आल्या. विचार आणि कार्य जरी भिन्न असले तरी, आता सर्वांचे ध्येय एकच आहे. त्यामुळे सामूहिक प्रयत्नातून हिंदूंच्या हिताचे निर्णय घेतले जात आहेत. लोकसभेत २ एप्रिल २०२५ रोजी वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाले आणि अमर्याद अधिकार असलेल्या 'वक्फ बोर्डा'च्या धर्मांध शक्तीला चाप बसला. तामिळनाडू, केरळसारख्या राज्यांत सरकारच्या ताब्यात असलेली मंदिरे मुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोर्चे व आंदोलनं होत आहेत. अनेक शहरांमध्ये बेकायदेशीर मशिदी, दर्गे यावर कारवाई करून जागा मोकळी केली जात आहे. काही राज्यांत लव्ह जिहाद रोखण्यासाठी कठोर कायदे लागू करण्यात आले आहेत. मथुरा आणि काशी मुक्त आंदोलनाला गती मिळाली आहे. ज्ञानवापी आणि श्रीकृष्ण जन्मभूमीवरील कायदेशीर लढ्यांमध्ये हिंदूंना सकारात्मक निर्णय मिळवण्यासाठी न्यायालयीन हालचाली सुरू आहेत. अनेक राज्यांनी समान नागरी कायदा लागू करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

**गझवा-ए-हिंदच्या जिहाद विरुद्ध सनातन राष्ट्राचा शंखनाद !**

जिहाद, आतंकवाद, इस्लामिक अतिक्रमण या 'गझवा-ए-हिंद'च्या षड्यंत्राला, नॅरेटीव्हला सनातन राष्ट्रच संपवू शकते, हे वरील घटनांमधून स्पष्ट होते. 'गझवा-ए-हिंद' ही विकृत रणनीती उध्वस्त करण्यासाठी सनातन राष्ट्र हीच प्रभावी दिशा आहे. या हेतूने 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात 'गझवा-ए-हिंद'च्या जिहादी विचारसरणीविरुद्ध शंखनाद होणार आहे. सनातन राष्ट्राच्या या दिव्य शंखनादापुढे 'गझवा-ए-हिंद'चा टिकाव लागू शकणार नाही.

'गझवा-ए-हिंद'सारख्या विचारांच्या विरोधात आपल्याला धर्माभिमान, एकजूट आणि सनातन मूल्यांची मशाल हाती घ्यावी लागेल. 'गझवा-ए-हिंद' सारख्या विघातक प्रवृत्तींना संपवायचे असेल, तर समाजहित, न्याय आणि धर्मनिष्ठतेवर आधारलेले छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य संकल्पने पासून प्रेरणा घेतलेले 'सनातन राष्ट्र'च निमर्ाण करावे लागेल. गझवा-ए-हिंदची सुरुवात कुठेही होऊ दे, त्याच्या शेवटाची सुरुवात सनातन राष्ट्रातूनच होईल, हे नक्की.

# जालन्यात भररस्त्यावर तलवारीने भोसकून एकाचा खून

## जालना शहरातील भोकरदन नाका परिसरातील घटना

**जालना । प्रतिनिधी -** शहरात भररस्त्यावर एकाचा तलवारीने वार करून निर्घुन खून करण्यात आलाय. शहरातील भोकरदन नाका परिसरातील रात्रीच्या ११ वाजेदरम्यानची ही घटना घडलीये. चार ते पाच हल्लेखोरांनी दुचाकीवर येत एकावर तलवारीने सपासप वार केले. यात त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झालाय. तर एक जण जखमी झाला आहे. ऊमेश समाधान ईंचे (वय ३१ वर्षे) रा.संजय नगर जालना याचा मृत्यू झाला असून त्याचा मित्र राम सखाराम निकाळजे (वय २८ वर्षे) रा. देऊळगावा राजा हा गंभीर जाखमी झाला आहे.

सदरील घटना सीसीटिव्ही कमेऱ्यात कैद झाली असून तीन ते चार हल्लेखोर दोन जणांवर धारदार शस्त्राने सपासप वार करत असल्याचे सीसीटिव्ही कमेऱ्यात दिसत आहे. वर्दळ आणि रहदारीच्या रस्त्यावर खुलेआम घटना घडल्याने हल्लेखोरांना कायदा आणि पोलिसांचा धाक राहिला नसल्याचे नागरीकांच्या वतीने चर्चा होत आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांनी घटनास्थळी धावा घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय सामान्य रुग्णालयात हलविण्यात आला.मयत व्यक्तीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असल्याने परिसरातील नागरीकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केले होती. पोलिसांनी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले रुपेश शेळके आणि पवन जाधव यांना सदर बाजार पोलिसांनी ताब्यात घेतले दरम्यान सदर बाजार पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक फरार आरोपीचा शोध घेत आहेत. या हल्ल्यामागील कारण अजून तरी अस्पष्ट असून कौटुंबिक कारणावरून हल्ला झाला असल्याची प्राथमिक माहिती आहे.

दरम्यान रात्री घटनेची माहीती मिळताच सदर बाजार पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक श्रीमती गायकवाड, डिबी प्रमुख शैलैश म्हस्के,पोलीस उपनिरिक्षक दिपाली शिंदे,अमंलदार राम प्रसाद रंगे,भरत ढाकणे यांनी घटनास्थळी भेट मृत्तदेह शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठविला. मयताची पत्नी सरला ईंचे च्या फिर्यादीवरुन सदर बाजार पोलीस ठाण्यात संतोष भिसे,पवन जाधव,आर्यन उध्दार आणि रुपेश शेळके यांच्या विरोधात सदर बाजार पोलीस ठाण्यात कलम १०३, १०९(१). ३५२, ३५१/३, ३/५ बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आलाय असून या प्रकरणात सदर बाजार पोलीस पुढील तपास करत आहे

# वक्फ सुधार जनजागरण अभियान अंतर्गत भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाची कार्यशाला



**जालना । प्रतिनिधी -** वक्फ सुधार जनजागरण अभियान अंतर्गत भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाची कार्यशाला ता.०७ रोजी भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाली. यावेळी भाजपा अल्पसंख्यक मोर्चा चे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी त्यांनी अल्पसंख्यांक मोर्चाच्या कार्येकर्ताला भेटुन वक्फ बोर्ड संशोधन बिल चे फायदा आणि समर्थन का महत्वाचे आहे या विषयावर माहिती दिली व अल्पसंख्यक मोर्चाच्या कार्यकर्त्यांना जनतेला भेटुन वकफ बोर्ड संशोधन बिल किती महत्वाचे आहे हे स्पष्ट करण्याच्या सूचना दिल्या. या कार्येकर्मात भाजपा अल्पसंख्यक प्रदेश सचिव सिकंदर आलीसाहब, भाजपा अल्पसंख्यक महानगर अध्यक्ष सैयद इमरान अली, तसेच पदाधिकारी नूर लाला खान, सज्जाद काजी, जुनेद मिर्जा, नदीम कुरैशी, शमबाजी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### वाचकांचे मनोगत

# मी मराठी वाचणार !

सध्या मुलांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या चालू आहेत. पालक आणि मुलं दोन्हीही वेगवेगळे छंद वर्ग लावण्यासाठी प्रयत्नरत आहेत. मुलांची शाळा चालू असताना 'मराठी' या विषयाकडे पाहिजे तेवढे लक्ष देण्याला वेळ मिळत नाही. महाराष्ट्रात राहून स्वतःची बोलीभाषा, मातृभाषा मराठी असूनही आम्हाला त्यातील बारकावे समजत नाहीत. त्यामुळे या सुट्टीच्या कालावधीमध्ये पालक आणि मुलं दोघांनीही 'मी मराठी वाचणार' हा निश्चय करूया आणि स्वभाषेविषयी प्रतिभा जागवूया. मराठी भाषेमध्ये एक वेगळीच गंमत आहे. मराठी भाषा परिपूर्ण आहे. यामध्ये असलेले वैभव आणि मधुरता समजून घेऊया. एकाच शब्दाचे अनेक अर्थ आहेत. जर का हे अयोग्य लिहिले तरीही अनेक प्रकारचे विनोद निर्माण होऊ शकतात. अगदी स्वल्पविराम, एकेरी अवतरण चिन्ह याची जागा जरी पालटली तरी वाक्याचा अर्थ पालटतो. अक्षरांवर जर चुकीचा अनुस्वार दिला तरीही शब्द बदलतो. मराठीतील गमत जम्मत सर्वजण मिळून या सुट्ट्यांमध्ये शिकूया. 'आमचा मुलगा फाडफाड इंग्रजी बोलतो', असे पालक म्हणताना दिसतात. हे म्हणताना त्यांना त्याचा अभिमानही वाटतो. त्याला मराठी येत नाही, मराठी समजत नाही हे म्हणताना सुद्धा आपल्याला कमीपणा वाटला पाहिजे. आपण एकमेकांशी बोलताना सहजपणे इंग्रजी वापरत असतो. खरं तर हे आपण मानसिक गुलामगिरीतच असल्याचे लक्षण आहे. भाषा अभिमानाचा संबंध थेट राष्ट्रभिमानाशी असतो. त्यामुळे पालकांनीही आपल्या मुलांच्या मराठी भाषा समृद्धीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. 'माझी मराठी भाषा मला आलीच पाहिजे', ही अस्मिता स्वतःमध्ये व आपल्या मुलांमध्ये जागृत करूया. मराठी ही आपली बोलीभाषा आहे. मुलांनाही ती जवळची वाटावी, आपली वाटावी या दृष्टीने पालकांचे मोठे दायित्व आहे. सध्याच्या मोबाईलच्या विळख्यातून आपल्या मुलांना दूर ठेवण्यासाठी व स्वभाषाभिमान जागृत करण्याचा सर्वजण निश्चय करूया, हो मी मराठी वाचणार !

**-प्रा. रोहिणी गोविंद जोशी,**
**छत्रपती संभाजी नगर**

# भोकरदन जाफराबाद मध्ये चाललेला वाळू माफियांचा उच्छाद थांबणार काय?

## सर्वसामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** भोकरदन जाफराबाद तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चोरून वाळू विकण्याचा प्रकार समोर येत असून, वाशिम बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये या भागातील वाळू चोरट्या मार्गाने पुरवठा केला जात असल्याची तक्रार भोकरदन जाफराबाद मधील नागरिक करत आहेत

जिल्हाभरात वाळूचे लिलाव झालेली नसताना भोकरदन जाफराबाद व घनसावंगी या तालुक्यामधून मोठ्या प्रमाणावर चोरटी वाळू बाहेरच्या जिल्ह्यामध्ये पाठवली जात असल्याचे अनेक नागरिकांचे म्हणणे असून , सर्वसामान्य नागरिकांना आपल्या घरासमोरून जाणारे मोठमोठे हायवा भरधाव वेगाने अनेक गावांच्या मधून जातात त्यामुळे खूप मोठा त्रास या हळव्यांच्या इजा करण्यामुळे होत असून ज्या नदीमधून वाळू उपसा केला जातो त्या नद्यां मध्ये मोठ मोठाले खड्डे पडले असून , महसूल विभाग मात्र याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप सर्वसामान्य जनतेमधून केला जात आहे

जिल्हाधिकारी महोदयांचे या संपूर्ण बाबीकडे दुर्लक्ष असून, महसूल विभागातील तहसीलदार नायब तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी फक्त हप्ते खोरी करत असून त्यामुळे वाळू माफियांचे चांगलीच फावले असल्याची भावना सर्वसामान्य जनता व्यक्त करीत आहे

जिल्हा प्रशासन व महसूल प्रशासन या वाळू माफियांकडे साप दुर्लक्ष करत असून यासंदर्भामध्ये आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचा आरोप सर्वसामान्य नागरिक करीत आहेत त्यामुळे जिल्हाधिकारी महोदयांनी या गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज असून त्यांनी आपल्या डोळ्यावर लावलेली पट्टी आठवत सर्वसामान्य नागरिकांना या त्रासापासून वाचवावे असेही अनेक नागरिकांचे म्हणणे आहे.

# अचानक आलेल्या पाऊस आणि हवाने केले फळाच्या राजाचे नुकसान

**टेंभुर्णी -** परिसरात झालेल्या पाऊसाने आणि आलेल्या जोरदार हवाने शेतकरी यांचे मोठे नुकसान झाल्याचे माहिती आहे. सध्या फळाचा राजा आंबे चांगले आलेले होते. याची विक्री करून शेतकरी यांचा बरा फायदा होता, मात्र निसर्गाला ते जणू मंजूर नाही असेच दिसून आले. दोन दिवसापासून सारखी हवा आणि पाऊस हा थोड्या फार प्रमाणात सुरु होता. त्या त हवा जोरात असल्याने कच्ची कैरी ही गळून पडली, आणि खाली पडल्या मुळे त्या मोठ्या प्रमाणात फुटल्या असून शेतकरी यांचे मोठे नुकसान झाले आहे. हा शेतकरी यांचा माल गावातील लहान व्यापारी खरेदी करत असत त्यांना ही हा माल खरेदी करता आला नाही आणि काही माल खरेदी केला तो खाली पडून त्यांचे ही नुकसान झाले असल्याची माहिती व्यापारी अस्लम शेख यांनी दिली असून काही काही व्यापारी यांचे ३० ते ४० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.



# जागतीक मधमाशा दिनी पुरस्कार वितरण सोहळ्याचे २० मे रोजी आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, महाबळेश्वर जिल्हा सातारा येथे दि. २० मे, २०२५ रोजी मधमाशी दिनाचे औचित्य साधुन मधमाशा पालन उद्योगामध्ये उत्कृष्ठ काम केलेल्या लाभार्थींस मधमाशी मित्र पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

पान १ वरुन

## महाराणा प्रतापसिंह ...

भीती आणि रूढी परंपरांवर मात करण्यास मदत होते. अशा निर्णयातून इतरांना सुद्धा देहदानासाठी प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांचा हा देहदानाचा निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल, तसेच अंगदान व देहदानाबाबत समाजात नवी जागरूकता निर्माण करेल, यात शंका नाही.



# मंठा येथे खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक संपन्न

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या शेतकरी हिताच्या सूचना

**मंठा । प्रतिनिधी -** कृषी विभागाने खते, बियाणे विक्रीत फसवणूक टाळण्यासाठी सतर्क राहावे. भेसळयुक्त बियाणे आणि लिंकिंग करणाऱ्या डीलरांवर कठोर कारवाई करावी. व्यापाऱ्यांनी साठेबाजी टाळून रास्त भावात खते, बियाणे उपलब्ध करावीत. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंठा तहसील कार्यालयात खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक गुरुवारी संपन्न झाली. यावेळी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि ग्रामीण शेती विकासासाठी सर्वसमावेशक उपाययोजनांवर चर्चा झाली. यावेळी ते उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की बँकांनी जाचक अटी लादू नयेत आणि शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज द्यावे. कमी कर्ज वितरण करणाऱ्या बँकांचा अहवाल रिझर्व्ह बँकेकडे पाठवला जाईल. शेतकऱ्यांनी आधुनिक शेती पद्धती अवलंबाव्यात. म तदारसंघातील प्रत्येक सर्कलमध्ये कीर्तनाद्वारे अध्यात्म आणि शेती तंत्रज्ञानाची जनजागृती केली जाईल. प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार करून प्रोत्साहन देण्याचे नियोजन आहे. हेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी नमूद केले.

याप्रसंगी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना आमदार लोणीकर यांनी राज्य सरकारच्या फळपिकांवरील अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती करावी. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत गावांना फळबाग, सिंचन, शेततळे, ट्रॅक्टर आदींचा लाभ द्यावा. असे आवाहन केले. पुढे कृषी विभागाच्या जबाबदारी बाबत आमदार लोणीकर यांनी सूचना देताना खरिपाच्या पेरणीसाठी रास्त भावात खते, बियाणे आणि औषधे उपलब्ध करून शेतकऱ्यांना सहाय्य करावे असे म्हटले आहे.

आमदार लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत कृषी विभागाला सक्रियपणे काम करण्याचे निर्देश दिले. बैठकीला सतिश निर्वळ, भाऊसाहेब गोरे, गणेशराव खवणे, संदीपभैया गोरे, पंजाबराव बोराडे, कैलासराव बोराडे, विलास घोडके, एनडी दवणे, कल्याण खरात, बंडू खरात, सोपानराव खरात, अम ोल मोरे, उपविभागीय अधिकारी गायकवाड, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, मंठा तहसीलदार श्रीमती जोंधळे, जालना तहसीलदार श्रीमती पवार, जालना गटविकास अधिकारी संदीप पवार, बँक प्रतिनिधी, कृषी सेवा केंद्र धारक, सरपंच, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक उपस्थित होते.

# सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार



**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च-२०२५ घेण्यात आलेल्या परीक्षेत एकूण३०८विद्यार्थी बसले होते पैकी २८२विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन महाविद्यालयाचा एकूण निकाल९१.५५% लागला आहे.पैकी कला शाखा ८०.९०%,वाणिज्य शाखा ९५% विज्ञान शाखा ९८.९६% निकाल लागला असुन याही वर्षी महाविद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम केली असुन कला शाखेतून प्रथम क्रमांक खरात अदिती दीपक(८१.३३%),द्वितीय क्रमांक लोखंडे वैष्णवी समाधान(७९.६७%),तृतीय क्रमांक दुडियार शुभांगी गजानन(७७.६७%), वाणिज्य शाखेतून प्रथम क्रमांक जंजाळ म नीषा संदीप(८३.८३%),द्वितीय क्रमांक नवले प्रवीण विजय(८३.५0%)तृतीय क्रमांक नागरिया आयुशी राकेश(७९.१७%)तर विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक मगरे प्राची बबन(८३.३३%),द्वितीय क्रमांक लहाने सुनील सोनाजी(७९%),तृतीय क्रम ांक पटेल आईरफ रजीक गुण संपादन केले आहे.सर्व गुणवंत आणि उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के,सचिव मा.प्रा.राहुलभाऊ म्हस्के,म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रम ेश देशमुख, उपप्राचार्य प्रो. डॉ.सुनील मेढे,डॉ.श्याम सर्जे,उपप्राचार्य (कनिष्ठ विभाग) प्रा.विनोद हिवराळे,प्रबंधक श्री.सुनील म्हस्के,तसेच कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



**भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीनंतर देशातील यंत्रणा सज्ज झाली असून जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी जालना शहर महानगर पालिकेच्या अग्निशमन दलास भेट देऊन आपत्कालीन परिस्थिती सज्ज राहण्याच्या सुचना केल्या आहेत. तसेच त्या दृष्टिने मार्गदर्शन केले आहे. यावेळी पोलीस अधिकारी आयुष नोपाणी, विजय फुलंब्रीकर यांच्यासह मनपा अग्निशमन विभागाचे कर्मचारी आदींची उपस्थिती होती.**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.